DISTRICT INDUSTRIES CENTRE,PARBHANI
जिल्हा उद्योग केंद्र,परभणी
पत्ता: कारेगांव नाका, परभणी .दुरध्वनी क्र ०२४५२-२२३४४७/२२६१६३
E-mail :- didic.parbhani@maharashtra.gov.in

## जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दि.18/12/2020चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समिती , परभणी ची पहिली सभा मा.श्री डी.एम.मुगळीकर, जिल्हाधिकारी, परभणी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 18/12/2020 रोजी सकाळी 11.00 संपन्न झाली. सभेस खालील प्रमाणे सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्यांची यादी

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | मा.श्री डी.एम.मुगळीकर | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष |
| 2 | श्री सुनिल हट्टेकर | जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, परभणी. |
| 3 | श्री एन बी सोमवंशी | राज्य कर व सेवा कर विभाग, परभणी. |
| 4 | श्री जी.आर.कांबळे | क्षेत्र व्यवस्थापक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, परभणी. |
| 5 | श्री ओमप्रकाश डागा | अध्यक्ष, जिल्हा औद्योगिक संघटना, परभणी |
| 6 | प्रतिनिधी, विदेश व्यापार महानिदेशालय, (DGFT) , पुणे | Online उपस्थिती |
| 7 | श्री जोहरी | संचालक, MSME, Online उपस्थिती |
| 8 | श्री प्रितम जंगम | उप व्यवस्थापक,नाबार्ड |

सर्वप्रथम सभेस उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,जिल्हा निर्यात प्रचालन समिती, परभणी यांनी केले व मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

जिल्हा निर्यात प्रचालन समिती बाबतचा शासन निर्णय सर्व सदस्यांना वाचन करुन माहिती देण्यात आली. DGFT, पुणे यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे सदर योजनेसाठी आपल्या विभागाचा आराखडा व पूरक माहिती ( Inputs) दयावेत अशा सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या. तसेच सभेमध्ये खालील विभागाने त्यांच्या विभागासंबंधी Inputs सादर केले.

| अ. क्र. | विभाग | पूरक माहिती (Inputs ) |
|---|---|---|
| 1 | DGFT , पुणे | 1.Major Provisions & Measures under the Foreign Trade Policy.<br>2.How to become Exporter<br>3.Export Promotion Capital Goods Scheme.<br>4.Advance Authorization Scheme.<br>5.Benefits for Deemed Exports<br>6.Merchandise Exports from India Scheme |

| | | |
|---|---|---|
| | | 7.Service Export from India Schme.<br>8.Trasnport and Marketing Assistance<br>9. Status holder Recognition Scheme<br>10 Marketing Development Assistance & Quality Complaints/ Trade disputes.<br>11. जिल्हयातील सात निर्यात करणारे उद्योगांची यादी दिली. |
| 2 | **वस्तू व सेवा कर विभाग** | 1.Zero rate Supply & Refund Scheme.<br>2.Department Provides Various Services to the taxpayers. |
| 3 | **MSME विभाग, मुंबई** | जिल्हानिहाय नोंदणीकृत उद्योग घटकांची यादी .<br>सादर केलेल्या यादीनुसार , परभणी जिल्हयामध्ये दि.12/11/2020 पर्यंत 13336 उद्योग कार्यरत आहेत. त्यापैकी 1491 लघु उद्योग , 30 मध्यम उद्योग व 11815 सुक्ष्म उद्योग नोंदणीकृत आहेत. निर्यात करणा-या उद्योगांना वेळोवेळी आवश्यक सहकार्य व विविध योजनांची माहिती MSME कडुन देण्यात येईल. |

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, नाबार्ड यांनी आपल्या विभागाची पूरक माहिती (Inputs) त्वरीत सादर करावेत अशा सुचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच निर्यात आराखडाही सादर करण्याच्या सुचना दिल्या.

शेवटी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक,
तथा सदस्य सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन परिषद,
जिल्हा उद्योग केंद्र, परभणी .

**मा.जिल्हाधिकारी,**
तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन परिषद,
परभणी.